# निशाणी ५ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम २००५ (हिंसाचार कायदा) चे कलम २३ प्रमाणे अंतरिम पोटगीसाठी आदेशासाठी केलेला आहे. प्रस्तुतचा अर्ज हा तिने हिंसाचार कायद्याच्या कलम १२ अन्वये दिलेल्या मुळ अर्जासोबत केलेला आहे.

२. गैरअर्जदाराने लेखी म्हणणे (निशाणी ११) दाखल करुन या अर्जास विरोध केला आहे.

३. या प्रकरणात उभयबाजूंकडुन वेगवेगळे कागदोपत्री पुरावे दाखल करण्यात आले. अर्ज, गैरअर्जदाराचे म्हणणे (निशाणी ११), सर्व कागदोपत्री पुरावे व प्रकरणाचा अभिलेख पाहिला. अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. ए. बी. चक्रे व गैरअर्जदारा तर्फे विधीज्ञ श्री. पी. पी. पाटील यांचा युक्तीवाद ऐकला.

४. अर्जदाराच्या अर्जातील कथने आणि तिने दाखल केलेली कागदपत्रे तथा अर्जदारातर्फे करण्यात आलेला युक्तीवाद यावरुन या अर्जाचे निर्णयाकरीता खालील मुद्दे निघतात. ते मुद्दे आणि त्यावरील माझा निष्कर्ष मी कारणांसहित खाली नमुद करीत आहे.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदाराने अर्जदारासोबत कौटुंबिक हिंसाचार केल्याचे अर्जदार प्रथमदर्शनी शाबीत करते काय ? | ...होकारार्थी |
| २. | या अर्जातील मागण्या पात्र होण्यास पात्र आहेत काय ? | ...अंशतः होकारार्थी |

३. काय ओदश ? अंतिम आदेशाप्रमाणे.

## कारणे

**मुद्दा क्र. १ ते ३ करीता –**

**५.** उभयबाजुंच्या कथनांवरुन अर्जदार व गैरअर्जदार यांचे लग्न दिनांक १४.०६.१९७८ रोजी शेलु बाजार, ता. मुर्तिजापूर येथे झाल्याचे दिसते. तसेच, अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामधील नातेसंबंध देखील वादातीत नाहीत. अर्जदाराच्या कथनान्वये जुन २०२२ रोजी गैरअर्जदाराने तिला नेसल्या कपड्यानिशी घराबाहेर हाकलुन दिले. तेव्हापासुन अर्जदार ही तीच्या आई वडिल व भावाकडे राहत आहे. याउलट गैरअर्जदाराचे कथन असे आहे की, सन २००३ साली अर्जदार स्वतःहुन घर सोडुन गेली तेव्हापासुन ती गैरअर्जदाराकडे नांदण्यास आली नाही. अर्जदाराने फौजदारी प्रकिया संहितेचे कलम १२५ अन्वये पोटगी मिळण्याकामी फौ . मु.क्र. २२/२००६ दाखल केला होता. परंतु सदर प्रकरण न्यायालयाने खारिज केले. अर्जदार सन २००३ पासुन गैरअर्जदारासोबत नांदलीच नाही म्हणुन अर्जदार हिला कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलाचे संरक्षण कायदा २००५ नुसार प्रकरण दाखल करुन या न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार नाही. गैरअर्जदार हा ७० वर्षाचा वयोवृध्द व्यक्ती असुन त्याची शारिरीक व मानसिक क्षमता ही अर्जदाराला त्रास देण्याची नाही म्हणुन अर्जदाराचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

**६.** अर्जदाराने तिच्या मुळ अर्जात व प्रस्तुत अर्जात गैरअर्जदारा विरुध्द मानसिक व शारिरीक छळाबाबत वेगवेगळया तक्रारी व आरोप केलेले आहेत. तिच्या कथनाप्रमाणे ती सासरी राहत असतांना गैरअर्जदाराने तिला मुल होत नाही व ती वांझोटी आहे या कारणावरुन वेळोवेळी शारिरीक व मानसिक छळ केला, शिवीगाळ केली व प्रसंगी मारहाणसुध्दा केली. अशा प्रकारे तिने गैरअर्जदाराने तिला वेळोवेळी

शारिरीक व मानसिक त्रास, कौटुंबिक हिंसाचार केल्याबाबतची कथने केली आहेत. छळाबाबतची सर्व कथने गैरअर्जदाराने जशीच्या तशी लेखी म्हणण्याद्वारे नाकारली आहेत. कौटुंबिक हिंसाचार अर्जदारावर झाला आहे किंवा नाही अगर अर्जदाराची कथने निराधार आहेत किंवा नाहीत याबाबत उभयबाजूंना पुराव्याची पुर्ण संधी दिल्यावरच निष्कर्ष काढणे योग्य व न्याय्य होईल. वर नमुद केल्याप्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार यांचेमधील नातेसंबंध दोघांनाही मान्य आहेत. तसेच, अर्जदार ही तिच्या माहेरी राहत असल्याचे देखील उभयबाजूंना मान्य आहे. अर्जदार ही गैरअर्जदाराची पत्नी असल्यामुळे तिच्या पालनपोषनाची कायदेशीर व नैतिक जबाबदारी हि पती या नात्याने गैरअर्जदाराची आहे. वर नमुद केल्याप्रमाणे कौटुंबिक हिसाचाराचा मुद्दा हा उभयबाजुंना पुराव्याची संधी देवून निकाली काढणे आवश्यक आहे . तथापि, या टप्प्यावर या प्रकरणाचा अंतिमतः निकाल लागेपर्यंत अर्जदार हिच्या आवश्यक गरजा पुर्ण होण्याकरीता अंतरिम आदेश होणे आवश्यक आहे का हेच पहावे लागेल.

७. कौटुंबिक हिंसाचार कायद्यात नमुद केलेली कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या ही अतिशय व्यापक व विस्तृत असुन अर्जदाराची पालण पोषण व उदरनिर्वाहाची व्यवस्था न करणे, प्रसंगी तिला मुल बाळ होत नाही म्हणुन तिला वांझोटी म्हणणे असे देखील कृत्य कौटुंबिक हिंसाचार या संज्ञेत येते. गैरअर्जदाराने अर्जदाराची पालण पोषण व उदरनिर्वाहाची व्यवस्था केली असे गैरअर्जदाराचे म्हणने नाही म्हणुन सकृतदर्शनी अर्जदारासोबत कौटुंबिक हिंसाचार गैरअर्जदाराने केला असे म्हणता येईल. या अर्जाद्वारे अर्जदार हिने गैरअर्जदाराकडुन रुपये ८ ,०००/– अंतरीम पोटगी मिळावी अशी मागणी केली आहे . त्यासाठी उभयपक्षकारांचे राहणीमान, उत्पन्नाचे मार्ग व त्यांच्यावरील जबाबदा –या विचारात घेणे आवश्यक आहे. गैरअर्जदार हा ७० वर्षाचा वयोवृध्द व्यक्ती असल्याचे दिसुन येते . त्याबाबत उभय पक्षकारांमध्ये दुमत नाही. तसेच, अर्जदार हिला उत्पन्नाचा स्वतंत्र मार्ग आहे

अशी गैरअर्जदाराची हकीकत आहे परंतु अर्जदार शिलाई मशिनचे काम करत असुन दररोज ३००/– ते ४०० /– रुपये कमविते ही बाब शाबित करण्यासाठी गैरअर्जदाराने कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही . अर्जदाराच्या कथनांप्रमाणे तिला उत्पन्नाचे कुठलेही साधन नाही. गैरअर्जदार हा शेती करतो परंतु सदर शेतीतुन गैरअर्जदार वर्षाकाठी १२,००,०००/– ते १५,००,०००/– कमवितो ही बाब शाबित करण्यासाठी अर्जदाराने सकृतदर्शनी पुरावा दाखल केला नाही. अर्जदाराने अभिलेखावर दाखल केलेल्या मौजे ठाणाठुणी येथील गट क्र . ४५/२ व ४७/१ या शेत जमिनीच्या ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर जमिणी हया गैरअर्जदाराच्या नावे नसुन वेणुबाई बोकडे व हेमंत बोकडे यांच्या नावे सदर शेत जमिण असल्याचे दिसुन येत आहे.

८. मा. सर्वोच्च न्यायालयाने ***राजनेश ..वि.. नेहा (2021) 2 SCC 324*** या केसमध्ये निर्देशीत केल्याप्रमाणे अर्जदाराने तिच्या स्थावर व जंगम मालमत्तेचे विवरणपत्र (नि.क्र.१३) अभिलेखावर सादर केले आहे. सदर विवरणपत्रात देखील अर्जदारास दरमहा ३,०००/– रुपये घरखर्च व १,०००/– रुपये वैद्यकिय खर्च येत असल्याबाबत अर्जदाराने नमुद केले आहे परंतु सदर कथनाच्या पुष्ट्यर्थ अर्जदाराने कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केला नाही . तसेच गैरअर्जदारास दरसाल रुपये १२,००,०००/– ते १३,००,०००/– शेतीतुन उत्पन्न मिळत असल्याचे जरी अर्जदाराने कोणताही कागदोपत्री पुरावा , सदर विवरण पत्र (नि.क्र.१३) सोबत दाखल केला नाही, म्हणुन अर्जदाराचा पुरावा की, गैरअर्जदारास दरसाल उत्पन्न रुपये १२,००,०००/– ते १३,००,०००/– मिळतात हा निष्कर्ष काढण्यासाठी पुरेसा नाही, कारण त्यासंबंधी कोणताही कागदोपत्री पुरावा विवरणपत्र (नि.क्र.१३) सोबत दाखल केलेले नाही. असे जरी असले देखील गैरअर्जदाराने देखील मा. सर्वोच्च न्यायालयाने वरील खटल्यात निर्देशीत केल्याप्रमाणे त्याच्या

स्थावर व जंगम मालमत्तेचे विवरणपत्र सादर केले नाही म्हणुन गैरअर्जदार हा जाणुनबुजुन त्याच्या उत्पन्नासंबंधी माहिती न्यायालयासमोर सादर करण्यास टाळाटाळ करीत आहे असा निष्कर्ष काढता येईल.

९. गैरअर्जदाराने अर्जदारास महिला हिंसाचार कायदा कलम २००५ अन्वये पोटगी मागण्याचा अधिकारच नाही असा कडाडुन आक्षेप नोंदविला . परंतु अर्जदार ही गैरअर्जदार नमुद करतो त्याप्रमाणे सन २००३ पासुन गैरअर्जदाराचा त्याग करुन वेगळी राहत आहे किंवा अर्जदार कथन करते त्याप्रमाणे जुन २०२२ पासुन ती गैरअर्जदाराने तिला हाकलुन दिल्यामुळे तिच्या आई वडिल व भावाकडे राहत आहे ही बाब खटल्यातील दाखल पुराव्या आधारे ठरणार आहे म्हणुन त्याबद्दल कोणतेही मत व्यक्त करणे येथे उचीत होणार नाही.

१०. सकृतदर्शनी अर्जातील कथनांचा विचार करता गैरअर्जदाराने अर्जदारासोबत कौटुंबिक हिंसाचार करुन तिच्या उदरनिर्वाहाची कोणतीही व्यवस्था न केल्याचे दिसुन येते म्हणुन अर्जदारास अंतरिम पोटगी देणे न्यायाच्या अनुषंगाने योग्य व रास्त होईल. अंतरिम पोटगीचा आदेश करण्यासाठी गैरअर्जदाराचे नेमके उत्पन्न पाहणे आवश्यक आहे. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे गैरअर्जदार यास दरसाल उत्पन्न रुपये १२,००,०००/- ते १३,००,०००/- परंतु, एवढे उत्पन्न शेतीतुन मिळत असल्याचे दाखवण्यासाठी कसलाही पुरावा दाखल नाही . असे जरी असले तरी देखील गैरअर्जदार वयोवृध्द आहे म्हणुन अर्जदारास अंतरिम पोटगी नाकारणे अर्जदारावर अन्याय केल्यासारखे होईल. मुळ अर्जातील अर्जदाराचे नमुद वय विचारात घेता अर्जदार देखील वयोवृध्द स्त्री आहे तसेच तिच्याकडे तिच्या चरितार्थ व उदरनिर्वाहासाठी उत्पन्नाचे साधन आहे असा देखील पुरावा गैरअर्जदाराने प्रस्तुत प्रकरणात दाखल केला नाही. उभयपक्षांचे राहणीमान विचारात घेता व अर्जदाराच्या मुलभूत गरजा विचारात घेता गैरअर्जदार याने अर्जदार हिस दरमहा रुपये

१,५००/– पोटगी देण्याचा आदेश करणे न्यायसंगत, योग्य व रास्त होईल. सबब, मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी व २ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवला असून मुद्दा क्र.३ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज (निशाणी ५) अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदार यास असे आदेशीत करण्यात येत आहे कि त्याने अर्जदार हिस अंतरिम पोटगी स्वरुपात दरमहा प्रत्येकी रक्कम रु. १,५००/– (रु. एक हजार पाचशे मात्र) अर्ज दाखल तारखेपासून मूळ अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत देण्याचा अंतरिम आदेश करण्यात येत आहे.

३. गैरअर्जदाराने या आदेशाप्रमाणे अंतरिम पोटगी अर्जदारास न दिल्यास अशा अंतरिम पोटगी वसूलीसाठी महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण नियम २००६ च्या नियम ६(५) अन्वये स्वतंत्र किरकोळ अर्ज दाखल करण्याची मुभा अर्जदारास आहे.

४. हिंसाचार कायद्याच्या तरतुदींमागील उद्देश व अर्जाचे स्वरुप व उभयपक्षकारांचे वय विचारात घेवून उभयपक्षकारांनी प्रस्तुतचे प्रकरण सर्वोच्च प्राधान्य देवून लवकरात लवकर चालवावे.

५. या आदेशाची प्रत्येकी एक प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना विनामुल्य देण्यात यावी.

६. अर्जाचा खर्च मूळ अर्जासोबत देण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर)

TAMBOLI ASIF GULAMDASTAGIR
Digitally signed by TAMBOLI ASIF GULAMDASTAGIR
Date: 2023.07.06 11:02:40 +0530

दिनांक– ०५.०७.२०२३.

(ए. जी. तांबोळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट नं.२,
मुर्तिजापूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Steno | Nayumsha Kadarsha Shah |
| Name of the Court | Jt.CJJD & JMFC, Murtizapur |
| Date of Order & Judgment | 05.07.2023 |
| Order/Judgment Signed by the P.O. on | 05.07.2023 |
| Order/Judgment uploaded on | 06.07.2023 |